# ** सूचना **

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या कनिष्ठ लघुलेखक (गट- क) संवर्गाच्या लेखी परिक्षेत किमान ४५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षा (Proficiency Test) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत गुरुवार, दिनांक १८/०६/२०२६ रोजी घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत प्राप्त झाला असून, मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निकालानुसार ऑनलाईन लेखी परीक्षा व व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांची तात्पुरती निवड/गुणवत्ता यादी मंडळाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**प्रशासकीय अधिकारी**,
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**, **मुंबई**